**अतिरिक्त दायित्वास मान्यता देण्याबाबतचे अधिकार व कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना.**

# महाराष्ट्र शासन

## जलसंपदा विभाग

**शासन निर्णय क्र. निविदा-१२१३/(७३५/१३) मोप्र-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ११ सप्टेंबर, २०१९

**संदर्भ -:**

१. शासन निर्णय क्र.निविदा-१२१३/(७३५/१३)मोप्र-१ दि.२२/१२/२०१७.
२. शासन निर्णय क्र.निविदा-१२१३/(७३५/१३)मोप्र-१ दि.०१/०३/२०१९

**प्रस्तावना:-**

जलसंपदा विभागाने संदर्भ क्र.१ च्या शासन निर्णयान्वये सिंचन प्रकल्पावरील आर्थिक दायित्वावर नियंत्रण ठेवण्याच्या दृष्टीने निविदेवरील निर्माण होणाऱ्या अतिरिक्त दायित्वास मान्यता देण्याबाबतचे अधिकार व कार्यपध्दतीबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. सदर शासन निर्णय हा केंद्र अर्थसहाय्यित प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना, आत्महत्याग्रस्त जिल्हयातील प्रकल्प तसेच अवर्षण प्रवण भागातील प्रकल्प पूर्ण करण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाच्या अर्थसहाय्याने प्रस्तावित केलेली बळीराजा जलसंजीवनी योजना व अनुशेषांतर्गत असलेल्या प्रकल्पांच्या करारामधील वाढीव दायित्वासाठी लागू करण्यात आला आहे.

तसेच संदर्भ क्र.२ अन्वये इतर प्रकल्पांतर्गत कामांच्या निविदांवरील निर्मित दायित्वाच्या अनुषंगाने कार्यपध्दत ठरविण्यात आली आहे.या आदेशाच्या कार्यान्वयानामध्ये येत असलेल्या अडचणीबाबत क्षेत्रीय स्तरावरुन शासनाला अवगत करण्यात आले होते. या अडचणींचा विचार करता संदर्भ क्र. २ चा शासन निर्णय अधिक्रमीत करुन संदर्भ क्र. १ चा शासन निर्णय निवडक अन्य प्रकल्पांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

१) संदर्भ क्र १. च्या शासन निर्णयातील तरतूदी व कार्यपध्दती प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना बळीराजा ,अनुशेष ,या व्यतिरिक्त परिशिष्ट “अ” मध्ये जोडण्यात आलेल्या प्रारुप यादीतील प्रकल्पांना लागू करण्यात येत आहेत.सदर प्रकल्पांच्या यादीचे दृढीकरण वित्त व नियोजन विभागाकडून करण्यात येईल.
२) या आदेशान्वये संदर्भ क्र.२ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.
३) कामाच्या प्रकारानुसार मूळ स्वीकृत निविदा किंमतीच्या तुलनेत कोणत्या मर्यादेपर्यंत अतिरिक्त दायित्व मान्य करता येईल, याबाबत स्वतंत्र आदेश निर्गमित करण्यात येतील.

सदर शासन निर्णय मा. मंत्रिमंडळाने दि. ०९/०९/२०१९ रोजीच्या बैठकीत दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेताक २०१९०९१११८१५२३२५२७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे .

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

**सहपत्र: परिशिष्ट "अ"**

Tirmanwar Santosh Ramkishan

Digitally signed by Tirmanwar Santosh Ramkishan
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Resources Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=cf0117ad341668a72bc3fcc8a83a2fab1d9b23e2ae276141178afc4dc8b5d790, serialNumber=37b5be33c57130083d7c9245fb12e91e0019861744c920676df5a5236c14b3a2, cn=Tirmanwar Santosh Ramkishan
Date: 2019.09.13 11:48:40 +05'30'

**( सं. रा. तिरमनवार )**
शासनाचे उप सचिव

**प्रत,**

१. महालेखापाल(लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर,
२. खाजगी सचिव, मा.मंत्री, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई,
३. खाजगी सचिव, मा.राज्यमंत्री, जलसंपदा व जलसंधारण विभाग,मंत्रालय,मुंबई,
४. मा.विधानसभा/ विधानपरिषद सदस्य सर्व,
५. स्वीय सहाय्यक, प्रधान सचिव(जसं), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
६. स्वीय सहाय्यक, सचिव(लाक्षेवि), जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
७. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (दवप्र) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
८. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (जसं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
९. स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (कृपातलं) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
१०.स्वीय सहाय्यक, मुख्य अभियंता (पा.) व सहसचिव, जलसंपदा विभाग, मंत्रालय,मुंबई,
११.सर्व तांत्रिक उपसचिव/अवर सचिव/उपअभियंता, जलसंपदा विभाग,मंत्रालय,मुंबई,
१२.सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे,
१३.महासंचालक, महाराष्ट्र अभियांत्रिकी संशोधन संस्था, नाशिक,
१४.महासंचालक, जल व भूमी व्यवस्थापन, औरंगाबाद,
१५.सर्व मुख्य अभियंता, पाटबंधारे विकास महामंडळे अंतर्गत,
१६.सर्व अधीक्षक अभियंता, जलसंपदा विभाग,
१७.सर्व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग,
मोप्र-१ कार्यासन, संग्रहार्थ.

ि

शासन निर्णय क्र. निविदा १२१३/प्रक्र.७३५/१३/मोप्र-१ दि. ११ सप्टेंबर २०१९ चे सहपत्र

**परिशिष्ट “अ”- प्रारुप यादी**

| **अ.क्र** | **प्रकल्पाचे नाव** | **महामंडळाचे नाव** |
|---|---|---|
| १ | शंकरराव चव्हाण विष्णुपुरी प्रकल्प | गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ |
| २ | अंतेश्वर प्रकल्प | |
| ३ | तारु गव्हाण प्रकल्प | |
| ४ | लेंडी आंतरराज्य प्रकल्प | |
| ५ | कृष्णा-भीमा स्थिरिकरण प्रकल्प (लिंक-५) | |
| ६ | कृष्णा मराठवाडा प्रकल्प | |
| ७ | पाथरवाला को.प.बंधारा | |
| ८ | पश्चिम वाहिनी पार खोरे | |
| ९ | उर्ध्व गोदावरी प्रकल्प व त्याअंतर्गत १० वळण योजना. | |
| १० | ल.पा. योजना अंबड | |
| ११ | पेंच प्रकल्प | विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ |
| १२ | कन्हान नदी प्रकल्प | |
| १३ | पंढरी मध्यम प्रकल्प | |
| १४ | वर्धा बॅरेज | |
| १५ | धामणी मध्यम प्रकल्प | महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे |
| १६ | भीमा प्रकल्प | |
| १७ | दूधगंगा प्रकल्प | |
| १८ | को.प.बंधारा जांभूड | |
| १९ | को.प.बंधारा वाफेगांव | |
| २० | आष्टी उ.सि.यो | |
| २१ | एकरुख उ.सि.यो | |
| २२ | गुरुवर्य कै. लक्ष्मणरावजी इनामदार जिहे कठापूर उ.सि.यो. | |
| २३ | वरणगांव तळवेल उ.सिं.यो. | तापी पाटबंधारे विकास महामंडळ, जळगांव |
| २४ | कु-हा वढोदा उ.सि.यो. | |
| २५ | निम्न तापी प्रकल्प | |
| २६ | बोदवड परिसर उ.सिं.यो | |
| २७ | २२ उ.सिं.यो. दुरुस्ती | |
| २८ | कोरडी ल.पा. | |
| २९ | पाणबारा ल.पा. | |
| ३० | भुरीवेल ल.पा. | |
| ३१ | भागपूर उ.सिं.यो. | |
| ३२ | देवघर म.प्र. | कोकण पाटबंधारे विकास महामंडळ ठाणे. |
| ३३ | नागेश्वरी ल.पा. | |
| ३४ | मुचकुंदी ल.पा. | |
| ३५ | भातसा (मुमरी) बिरवाडीसह | |
| ३६ | देहरजी प्रकल्प | |
| ३७ | कवडास बंधारा उंची वाढ | |
| ३८ | तिडे ल.पा. | |
| ३९ | सांबरकुंड मध्यम प्रकल्प | |